# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
## मा.इ प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- ७
## सभावृत्तांत

**दिनांक - ०१/०२/२०१८** **वेळ दुपारी २:०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०१/०२/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.भिमाबाई पोपट फुगे - **अध्यक्षा**

२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

३) मा.डोळस विकास हरिचंद्र

४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

५) मा. घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन

६) मा.गायकवाड निर्मला मनोज

७) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी

८) मा.गोफणे अनुराधा देविदास

९) मा.बारसे प्रियांका प्रविण

१०) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

११) मा. श्री नितीन ज्ञानेश्वर लांडगे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.चंद्रकांत इंदलकर - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.निकम एम.बी.लेखाधिकारी - मा.श्री.जीवन गायकवाड – कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.श्री.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता (विद्युत), श्री.पवार – कार्यकारी अभियंता – (पाणीपुरवठा), मा.श्री.बी.पी.लांडे उपअभियंता (विद्युत) मा.श्री.व्ही.सी.काळे- उपअभियंता (स्थापत्य),मा.श्री.राजेंद्र शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.बोरावके डी.एच. उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.ए.के. कोंडे- उपअभियंता (पा.पु.), मा.श्री.डी.डी.गवळी -उपअभियंता (ज.नि.)मा.श्री.आर. बी.मोहाडीकर - उपअभियंता (पर्यावरण) मा.श्री.जाधव व्ही.के. उपअभियंता (स्थापत्य उद्यान), मा.श्री.एस.व्ही.बगाडे- उद्यान (सहा.उद्यान अधिक्षक) श्री.तानाजी गायकवाड – हॉर्टी सुपरवायझर, श्री.गणबोटे ए.पी.- क.अभियंता (स्थापत्य), श्री.ताकवले क.अभियंता (स्थापत्य.), श्री.वाडकर एस.व्ही. - क.अभियंता (स्थापत्य), श्रीम.वृषाली पोतदार क.अभियंता (स्थापत्य), श्री.क्षीरसागर आर.व्ही. क.अभियंता (स्थापत्य.), श्री.बेळगांवकर जे.एस- क.अभियंता (पा.पु.), श्री.पवार व्ही.एस.क.अभियंता (विद्युत), श्री.कातोरे पी.बी. क.अभियंता (विद्युत). श्री.संदीप ठोकळ - क.अभियंता (ज.नि.), श्री.प्रभाकर तावरे - सहा.आरोग्य अधिकारी, श्री.साबळे- आर.आर- आरोग्य निरीक्षक, श्री.वाघमारे एस.एच. – आरोग्य निरीक्षक, श्री.रोकडे सी.आर.- आरोग्य निरीक्षक, श्री.घाटे एस.पी. - आरोग्य निरीक्षक श्री.शेलार ए.बी. क.अभियंता (ज.नि.), श्री.निखील फेंडर क.अभियंता,

(स्थापत्य उद्यान), श्री.गायकवाड पी.आर.मुख्याध्यापक माध्य.विद्यालय,भोसरी, सौ.भोज जे.एस.क्रीडा पर्यवेक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

-------

**मा.अध्यक्षा -** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**मा.विकास डोळस -** मा.सभापती सौ. भिमाबाई फुगे यांचा वाढदिवस आहे. त्यानिमीत्त त्यांना सभागृहाचे वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देणेत याव्यात.

**(सन्मा नगरसदस्य मा. अनुराधा गोफणे ,मा.लक्ष्मण उंडे , मा. घुले नानी उर्फ हिराबाई , मा.प्रियांका बारसे यांनी मा.सभापती सौ. भिमाबाई फुगे त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. )**

**-----**

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-----**

**विषय क्रमांक – १)** बहुउद्देशीय इमारतीस नामकरण देणेबाबत मा.लक्ष्मण धोंडू उंडे यांचकडील दिनांक ०१/०२/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक –** २) दिघी गावठाणातील दिघी म.न.पा.शाळेजवळील जुनी पाण्याची टाकी पाडणे बाबत. मा. विकास डोळस यांचे दिनांक १/२/२०१८ चे पत्र

**विषय क्रमांक – ३)** महाराष्ट्र अधिनियम २००५ अन्वये रस्ता करण्यास मान्यता देणे बाबत. श्री.सागर बाळासाहेब गवळी यांचेकडील दिनांक १/२/२०१८ चे पत्र.

**------**

अ) दिनांक ०४/०१/२०१८ रोजीची रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रम पत्रिका ०६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

**यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

**------**

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक- १

दिनांक - ०१/०२/२०१८

सूचक- मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ – मा.लक्ष्मण धोंडू उंडे यांचकडील दिनांक ०१/०२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३१ दिघी (नवीन प्र..क्र.४ दिघी बोपखेल) मधील स.नं.७९ मध्ये ताब्यात आलेला सुविधा भूखंडामध्ये बहुउद्देशीय इमारत बांधण्यात आलेली आहे. सदर इमारतीस खालीलप्रमाणे नामकरण करण्यात यावे.

“ पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८”

“ शहिद कर्नल संतोष महाडीक सैनिक भवन” सदरच्या विषयास मान्यता देण्यात येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक- २

दिनांक - ०१/०२/२०१८

सूचक- मा.विकास डोळस अनुमोदक – मा. लक्ष्मण उंडे

संदर्भ – मा. विकास डोळस यांचे दिनांक १/२/२०१८ चे पत्र

दिघी म.न.पा.शाळेजवळ ग्रामपंचायत काळामधील जुनी पाण्याची टाकी आहे. सदर टाकी ग्रामपंचायतीने बांधलेली होती. सद्यस्थितीत सदरची टाकी वापरात नसून ती अनेक वर्षे जुनी असल्याने तसेच तिचे कॉलम जिर्ण झालेले आहे. पाण्याची टाकी अचानक कोसळण्याची शक्यता आहे त्यामुळे जिवितहानी होऊ शकते. सबब सदरची पाण्याची टाकी जुनी व जिर्ण झालेली असल्यामुळे तसेच वापर बंद असल्यामुहे जिवितहानी होणार नाही यादृष्टीने पाण्याची टाकी पाडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ३० विषय क्रमांक- ३

दिनांक - ०१/०२/२०१८

सूचक- मा.सागर गवळी अनुमोदक – मा.प्रा.सोनाली गव्हाणे

संदर्भ – श्री.सागर बाळासाहेब गवळी यांचेकडील दिनांक १/२/२०१८ चे पत्र.

श्री.सागर बाळासाहेब गवळी, सभापती शहर सुधारणा समिती मौजे भोसरी येथील प्रभाग क्र. ५ मध्ये भोसरी आळंदी रस्त्यापासून (महाराष्ट्र चौक) उत्तरेस आ.क्र. ४०७ खेळाच्या मैदानापर्यंतचा रस्ता विकसीत आहे तसेच शास्त्री चौकापासून स.न. २०० पर्यंत उत्तरेस जागेवर रस्ता विकसीत आहे. प्रभाग क्र. ५ मधील स.नं. २०० व स.न.२०१ मधील नागरीक स.न.२०० मधून (गुळवे मैदानातून) ये जा करतात. सदर स.नं.२०० मधील (गुळवे मैदानामधील) रस्ता जागेवर विकसीत नाही. सदरचा रस्ता जागेवर विकसीत केल्यास तेथील रहिवासींच्या दळणवळणाचा प्रश्न कायमचा सुटणार आहे. तरी आ.क्र. ४०७ खेळाचे मैदानापासून पुर्वेस (गुळवे मैदान) स.नं. २०० मधून मोकळया जागेतील रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २००५ अन्वये घोषीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

यानंतर मा.सभापती यांनी आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९.
क्र-इक्षेका/काvि/४/३३/२०१८
दिनांक- २०/०२/२०१८

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
(सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दिनांक ०१/०२/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे सन्मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.प्रियांका बारसे-** प्रभाग समितीची मिटींग महत्वाची असून देखील नगरसेवक मिटींगला उपस्थित नसतात. बाकी नगरसेवकांना वॉर्डमधील विकास कामे करणे महत्वाचे वाटते त्यामुळे ते मिटींगला उपस्थित असतात.

**मा.अनुराधा गोफणे –** प्रभाग समितीच्या मिटींगला यापुर्वी फोन करीत होते. आता मला फोन करीत नाहीत. असे का केले जाते.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** मिटींगबाबतचे कामकाज प्रशासन अधिकारी तथा सचिव यांचे मार्फत करण्यात येते. प्रत्येक महिन्याला विहित मुदतीत मिटिंग बाबतचा अजेंडा घरपोच पाठविला जातो. सन्मा.सदस्य कामामध्ये व्यस्त असल्याने त्यांना मिटींगबाबत आठवण करुन देण्यासाठी दुरध्वनी केला जातो. तथापि प्रभाग समितीच्या कामकाजानुसार मासिक सभेबाबत दूरध्वनी व भ्रमणध्वनी करण्याची तरतूद नाही.

**मा.सागर गवळी –** MSEB चे अधिकारी वर्ग मिटींगले उपस्थित राहिले आहेत त्याचे स्वागत करण्यात येत आहे. भोसरी येथील पी.एम.टी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे कामकाजाबाबत सर्व विभागांची काय परिस्थीती आहे?

**मा.बोरावके –उपअभियंता (स्थापत्य)** - छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे चौथ-याचे काम पूर्ण झाले आहे. फक्त छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवायचा आहे. १९ फेब्रुवारी त्यांचे जयंतीपर्यंत कामकाज पुर्ण होईल.

**मा.प्रविण घोडे – कार्यकारी अभियंता (विद्युत) –** LED फिटींगचे कामकाज झाले आहे. बाकी कामे १५ फेब्रुवारी पर्यंत पुर्ण होईल.

**मा.सागर गवळी** - MSEB चे केबल पडलेले असतात. भोसरी येथील लाईट नेहमी जात असते. तेथे वायरमन येत नाही. त्याची दखल घेतली जात नाही. भोसरीमध्ये लाल बॉक्स (डी.पी) ची दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे अपघात (जिवीतहानी) होण्याची शक्यता आहे. तरी लाल बॉक्स (डी.पी) योग्य ठिकाणी शिफ्ट करण्यात यावे. याबाबत MSEB कडे खूप पाठपुरावा केला आहे.

**मा. सुळ (स.अ.महावितरण उपविभाग, भोसरी)** - MSEB कडून लाल बॉक्स (डी.पी) शिफ्टींग करायचे असेल तर फंडातून खर्च करीत असतो. च-होलीचे शिफ्टींगचे काम वायरमन करतात. आज गुरुवार असल्यामुळे मेटनन्सची कामे चालू आहे. त्यामुळे काही कर्मचारी आलेले नाही.

**मा.सागर गवळी –** सावंतनगर, आदर्शनगर येथील शिफ्टींग करायचे आहे. त्यामुळे रस्त्याची कामे होत नाही.

**मा. सुळ (स.अ.महावितरण उपविभाग, भोसरी)** – हेडऑफीसला प्रपोजल गेले आहे. त्याची नोंद करुन पाठपुरावा केला जाईल.

**मा.सभापती –** राधानगरी येथील झाडे तोडायला सांगि तले होते. परंतू झाडे तोडण्यासाठी लोकांनी पैसे घेतो असे सांगितले.

मा. बगाडे (उद्यान)- ठीक आहे, मी बोलतो.

**मा.विकास डोळस** - MSEB चे अधिकारी/कर्मचारी वर्ग मिटींगले उपस्थित राहिले आहेत त्याबद्दल त्यांचे स्वागत करण्यात येत आहे. गजानन नगर, आदर्शनगर, ममता स्वीट या ठिकाणी MSEB कडून लाईटचे पोल शिफ्ट करुन देणे. जेवढी आवश्यक गरजेची कामे आहेत त्याची लिस्ट देण्यात येईल. त्यानुसार सर्व कामे झाली पाहिजे.

**मा.प्रियांका बारसे –** पशुवैद्यकिय विभागातील डॉ.गोरे हे नुकतेच रिटायर्ड झाले आहेत. त्यांचे जागेवर कोण काम करीत आहे याबाबत माहिती पाहिजे. प्र.क्र. ५ मध्ये श्रीकृष्णमंदीर येथे एक कुत्रा आहे. त्याचे तोंडातून रक्त पडत आहे. तसेच येणारे जाणारे नागरीकांना त्याचा त्रास होत आहे.

**मा.विकास डोळस -** पशुवैद्यकिय विभागामध्ये पारसी साहेब आहेत ते कधीही फोन घेत नाहीत. त्यामुळे कुत्र्यांची तक्रार देऊ शकत नाही.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** पशुवैद्यकिय विभागातील डॉ.गोरे हे नुकतेच नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. तथापि आजारी कुत्र्यांबाबत वैद्यकिय विभागाचे डॉ.रॉय (आरोग्य वैद्यकिय अधिकारी) यांचेकडे पाठपुरावा केला जाईल. सन्मा.सदस्य यांचे तक्रारीबाबत डॉ.रॉय यांचे विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल.

**मा.अनुराधा गोफणे –** प्रभाग क्रमांक ५ मधील स्थापत्य विभागातील किती कामांची वर्क ऑर्डर आलेल्या आहेत त्याबाबतची माहिती देणेत यावी. ड्रेनेजच्या कामाची काय परिस्थिती आहे.

**मा.व्ही.सी.काळे – उपअभियंता (स्थापत्य) -** स्थापत्य विभागाचे ११ वर्क ऑर्डर आलेल्या आहेत. एकूण २० वर्क ऑर्डर आहे. ४ कामे चालू आहेत. चेंबर दुरुस्तीचे काम सुरु केले आहे. निविदा स्विकृतीसाठी मा.स्थायी समितीमध्ये दिले आहे.

**मा.बी.डी.गवळी – उपअभियंता (जलनि:सारण)-** ड्रेनेजची सात कामे आलेली आहेत. वर्क ऑर्डर झालेली आहे. सहा वर्क ऑर्डरसाठी एग्रीमेन्ट ओपनींगसाठी थांबली आहे.

**मा.अनुराधा गोफणे -** माझे प्रभागामध्ये एक नाला आहे. त्याचे झाकण तुटलेले आहे. किती दिवसापासून झाकण बसविण्यासाठी पाठपुरावा करीत आहे. त्या नाल्यामध्ये एक लहान मुलगा पडला होता. सुदैवाने तो मुलगा बचावला. जर त्या मुलाला काही झाले असते तर ती संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहिली असती. तरी या नाल्याचे कामाबाबत तातडीने आदेश देण्यात यावे. स्थापत्य विभागाला विनंती करण्यात येते की तातडीने नाल्याचे तुटलेले झाकण बसविण्यात यावे.

**मा.सागर गवळी –** प्रभाग क्रमांक ५ अ मध्ये पाण्याचा खूप प्रॉब्लेम आहे. पावसाळयापुर्वी चार महिन्यात पिण्याचे पाण्याचे सर्व पाईपलाईनचे काम झाले पाहिजे. पाण्याचा फार मोठा गंभीर प्रश्न आहे.

**मा.पवार कार्यकारी अभियंता – (पाणीपुरवठा) -** प्रभाग क्रमांक ५ अ मधील सर्व कामे करण्यात येईल.

**मा. विकास डोळस -** दिघीमधील गणेशनगर येथे २४x७ पाणीपुरवठा करणे. नागरीकांना खूप गरज आहे. पाईप लाईनचे काम कुठे करायचे आहे ते आम्हाला चांगले माहि त आहे. तेथे पाच,सहा फूट पाण्याची पाईप लाईन आहे. आमचे येथील पाण्याची पाईप लाईन बदलून दयावी.

**मा.पवार कार्यकारी अभियंता – (पाणीपुरवठा) –** दि घी प्रभाग क्र. मधील काम लडकत साहेब पाहत आहेत. मी लडकत साहेबांबरोबर बोलतो.

**मा.अनुराधा गोफणे -** भोसरी, प्रभाग क्रमांक ५ मध्ये पिण्याचे पाणी कमी वेळ व कमी दाबाने येते. तरी पिण्याचे पाणी वेळेत व प्रेशरने देण्यात यावे.

**मा.बेळगांवकर जे.एस- क.अभियंता (पा.पु.) -** ठीक आहे पिण्याचे पाणी वेळेत व प्रेशरने देण्यात येईल.

**मा. घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन-** भारतमातानगर मध्ये ड्रेनेजचे घाण पाणी पिण्याच्या पाईप लाईन तुटल्यामुळे पिण्याचे पाण्यात मिक्स होत झालेले आहे. आमचे येथील महिलांनी पाण्याची बॉटल प्रत्यक्ष दाखविली आहे. त्या पाण्याचा खूप वास येत आहे. पाण्याचे पाईप लिकेज भरपूर आहे.

**मा.बेळगांवकर जे.एस- क.अभियंता (पा.पु.),** - दोन दिवसात नवीन पिण्याच्या पाण्याचे पाईप लाईन टाकण्याचे काम करुन देण्यात येईल.

**मा.प्रियांका बारसे –** भोसरी येथील  शास्त्रीचौकातील कच-याबाबत जास्त तक्रारी असतात. घंटागाडी कर्मचारी कच-याची विल्हेवाट व्यवस्थित लावत नाही.

**मा.प्रभाकर तावरे – सहा.आरोग्य अधिकारी –** सध्या कच-याच्या गाडया फिरत असतात. परंतू त्या कमी पडतात. त्यामुळे कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी गाडया वाढविण्यात येईल.

**मा.प्रियांका बारसे –** मिटींगमध्ये नगरसेवक बोलतात ते नागरीकांपर्यंत पोहोचण्यासाठी मासिक सभेमध्ये पत्रकार असणे गरजेचे आहे. तसेच मा.महापालिका सभेचा ज्याप्रमाणे संपूर्ण सभावृत्तांत असतो तसाच प्रभाग समितीच्या मासिक सभेचा संपूर्ण सभावृत्तांत असला पाहिजे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** प्रभाग समितीच्या सभेचा संपूर्ण इतिवृत्तांत  असावा असा प्रभाग समितीच्या नियमामध्ये समावेश नाही. तथापि सन्मा.सदस्य यांचे प्रश्न व चर्चेबाबत समावेश केला जाईल.

**मा.सागर गवळी-** MSEB चे अधिकारी/कर्मचारी वर्ग यांनी सगळी कामे मार्गी  लावा  व कामाबाबत तक्रारी येणार नाही याची दखल घ्या.